महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
CIN : U40109MH2005SGC153645

दु. क्र. (का.) : २६४७४२११, २६४७२१३१
Email : cedistmsedcl@gmail.com
Website : www.mahadiscom.in

प्लॉट क्र.जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

**क्र. मु.अ. (वितरण)/डी-३/NHAI Circular/२३७९९** **दिनांक : २८/०९/२०१७**

# परिपत्रक

**विषय :-** राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, स्थानिक संस्था यांचेमार्फत रस्ता रुंदीकरण / नवीन रस्ते बांधणे / पुल बांधणी कामासाठी विद्युत वाहिनी स्थलांतर करताना मार्गदर्शक सुचना.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, स्थानिक संस्था यांचेमार्फत रस्ता रुंदीकरण, नवीन रस्ते बांधणे, पुलाचे बांधकाम इ. कामे केली जातात व त्यांनी केलेल्या विनंतीनुसार अस्तित्वात असलेल्या विद्युत पायाभूत सुविधांचे स्थलांतर इ. कामे महावितरण मार्फत करण्यात येतात.

सद्यस्थितीत, वरील नमुद कार्यालयांचे प्रतिनिधी विद्युत पायाभूत सुविधांच्या स्थलांतराच्या अंदाजपत्रकाकरीता महावितरणच्या क्षेत्रिय कार्यालयाशी संपर्क साधतात. मुल्यमापनानुसार कामांचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास महावितरणच्या सक्षम अधिकाऱ्यांनी मंजुरी दिलेली आहे. तथापी असे आढळून आले आहे की, सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी अंदाजपत्रक तयार करताना एक सारखी पध्दत अवलंबलेली नाही. अवास्तव रकमेच्या अंदाजपत्रकामुळे महावितरणच्या मुख्य कार्यालयास त्यासंबंधी बऱ्याच तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे व्यवस्थापनाने या विषयाकडे गांभिर्याने लक्ष देऊन व संपुर्ण राज्यात अंदाजपत्रक तयार करताना एकसारख्या पध्दतीचे पालन करण्याचा निर्णय घेतला आहे. क्षेत्रिय कार्यालयाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर अस्तित्वात असलेल्या विद्युत वितरण प्रणालीच्या स्थानांतरणाचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी खालील पध्दतींचा अवलंब करावा.

१. अस्तित्वात असलेल्या विद्युत पायाभूत संरचनेच्या स्थलांतरासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, स्थानिक संस्था इ. चा अर्ज मंडल कार्यालयात स्विकारला जाईल आणि सदरील अर्ज संबंधित विभागीय कार्यालयास पाठविला जाईल व सदर कामांचे सर्वेक्षण करुन अंदाजपत्रक तयार करण्यात येईल.

   कामाचे संयुक्त सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रक तयार करणे तसेच देखरेख करणे इ. करीता मंडल कार्यालयाचे अधीक्षक अभियंता संयुक्त समिती स्थापन करतील. सदर समितीत कार्यकारी अभियंता (म.रा.वि.वि.कं.मर्या.), कार्यकारी अभियंता (राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण), कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग), कार्यकारी अभियंता (स्थानिक संस्था) इ. संबंधितांचा समावेश असेल. वरील कामे SOP नुसार २ दिवसात करण्यात यावी.

२. विभागीय कार्यालयास अर्ज प्राप्त झाल्यानंतर संयुक्त समिती देण्यात येणाऱ्या कामाचे संयुक्त सर्वेक्षण करुन तसा अहवाल तयार करेल. सदर अहवालावर सर्व समिती सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असतील. (SOP नुसार १ आठवडा)

३. संयुक्त समितीचा सर्वेक्षण अहवाल तसेच महावितरणचे प्रचलित दरपत्रक व लागू असलेले दर इ. विचारात घेऊन अंदाजपत्रक तयार करण्यात येईल. (SOP नुसार ३ दिवस).

४. अस्तित्वात असलेल्या विद्युत पायाभूत सुविधा व प्रस्तावित विद्युत वाहिन्यांचे स्थानांतर दर्शविलेल्या ठिकाणाचे रेखाचित्र (सिंगल लाईन ड्रॉईंग) तयार करण्यात येईल. सदर अंदाजपत्रकास दिलेल्या अधिकारांनुसार विभागीय कार्यालयाचे कार्यकारी अभियंता अथवा मंडळ कार्यालयाचे अधीक्षक अभियंता अथवा परिमंडळ कार्यालयाचे मुख्य अभियंता यांच्यामार्फत १ आठवडयात मंजुरी देण्यात येईल. सक्षम अधिकाऱ्यांकडून १.३% देखरेख खर्चाची मागणी पत्रक कंत्राटदारास देण्यात येतील.

५. संयुक्त सर्वेक्षण व अंदाजपत्रक तयार करताना खालील बाबींचा विचार केला जाईल.

अ) महावितरणच्या देखरेखी खाली सदर काम करण्यात येणार असल्याकारणाने संबंधित प्राधीकरणाकडून १.३% देखरेख खर्च देण्यात येईल तसेच सदरील कामाची अंमलबजावणी महावितरणच्या प्रचलीत नियमानुसार करण्यात येईल याबाबतचे संमतीपत्र संबंधित प्राधीकरणाकडून घेण्यात येईल.

ब) अंदाजपत्रक तयार करताना वहिवाटाचा हक्क असल्यास (ROW) त्याची माहिती शासकीय प्राधीकरण जसे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, स्थानिक संस्था यांचेकडून घेतली जाईल. सदरील माहिती "Manual of Specification & Standards, Planning Commission Government of India, New Delhi (Four-laning of Highways through Public Private Partnership) आणि Appendix B-I(Details of proposed Right of Way (ROW))" यामध्ये दिलेल्या मार्गदर्शकानुसार घेण्यात याव्यात. (सोबत जोडलेले आहे)

क) जेथे रस्ते एकमेकांस ओलांडतात त्या ठिकाणी (रस्ता क्रॉसिंग) भूमिगत वाहिनी प्रस्तावित असल्यास RCC duct चा व्यास किमान ३०० मी.मी असला पाहिजे व एक अतिरिक्त भुमिगत मार्ग (duct) संबंधित प्राधीकरणाकडून पुरविण्यात यावा.

६. भूमिगत वाहिन्या टाकताना महावितरण कंपनीच्या प्रचलित नियमानुसार साधन सामग्री वापरली जाईल व महावितरण कंपनीच्या कार्यपध्दतीनुसार भूमिगत वाहिन्या टाकाव्यात. सदरील कार्यपध्दती खालील प्रमाणे आहेत.

अ) लघुदाब वाहिनी ही XLPE armored cable with Aluminium conductor असलेली, भारतीय मानके लागू असलेली व CCI/Universal/Polycab/Unicab या कंपनीची किंवा समतुल्य कंपनीची व निविदेमध्ये प्रमाणित असलेली वापरण्यात यावी.

ब) ३३ के.व्ही./२२ के.व्ही/११ के.व्ही. उच्चदाब वाहिनी ही XLPE armored with Aluminium conductor असलेली, भारतीय मानके लागू असलेली व CCI/Universal/Polycab/Unicab या कंपनीची किंवा समतुल्य कंपनीची व निविदेमध्ये प्रमाणित असलेली वापरण्यात यावी.

क) भुमिगत लघुदाब वाहिनी १.० मी. व उच्चदाब विद्युत वाहिनी १.२ मी. जमिनीखाली असावी.

ड) सदरील कामे विद्युत कायदा २००३, भारतीय विद्युत अधिनियम व महावितरणच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार करण्यात यावीत.

ई) सदरील कामे अधीक्षक अभियंता, महावितरण किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी स्थापन केलेल्या संयुक्त समितीच्या देखरेखीखाली करण्यात यावी.

७. अभियंता किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत cable jointing करण्यात यावीत.

अ) तारेचा फास (cable loop), खांबाची उंची आणि रस्ता ते खांब यांमधील अंतर २.५ मी. असेल त्या ठिकाणी केबल टाकण्यात यावी. (सोबत रेखाकृती जोडलेली आहे.)

ब) जेथे रस्ते एकमेकांस ओलांडतात त्या ठिकाणी (रस्ता क्रॉसिंग) आपाती (stand by) भुमिगत विद्युत वाहिनीची व्यवस्था करावी.

क) संबंधित प्राधिकरणांच्या विनंतीवरुनच राजमार्गावरील सर्व उपरी वाहिन्या सुरक्षतेच्या कारणास्तव भुमिगत करण्यात याव्यात.

८. आडवे भोक पाडणे (HDD)

सामान्यत: जेथे रस्ते एकमेकांस ओलांडतात त्या ठिकाणी (रस्ता क्रॉसिंग) भुमिगत वाहिन्या टाकण्यासाठी आडवे भोक पाडण्याची (बोर करण्याची) आवश्यकता असते. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत दि. १९.०७.२०१७ रोजी MSRDC कार्यालय, बांद्रे येथे झालेल्या बैठकीत या संबंधी (HDD) चर्चा करण्यात आली आणि निश्चित करण्यात आले की, जेथे रस्ते एकमेकांस ओलांडतात त्या ठिकाणी (रस्ता क्रॉसिंग) भूमिगत वाहिनी प्रस्तावित असल्यास RCC duct चा व्यास किमान ३०० मी.मी असला पाहिजे व एक जादा duct संबंधित प्राधीकरणाकडून (राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण / सार्वजनिक बांधकाम विभाग / स्थानिक संस्था) पुरविण्यात यावा. जोपर्यंत संबंधित प्राधिकरण आग्रह करत नाहीत तोपर्यंत आडवे भोक पाडण्याचा दर आकार अंदाजपत्रकात घेण्यात येऊ नये. जर संबंधित प्राधिकरण आग्रह करत असेल तर बोअरचा आकार फक्त २५ मीटर पर्यंत किंवा प्रत्यक्ष रोडची रुंदी यातील जे कमी असेल त्यास अनुसरुन बोअरचा आकार मर्यादीत केला जाईल.

९. जुन्या साहित्याचा वापर करणे

अ) सद्यस्थितीत चांगल्या स्थितीत असलेल्या वाहिन्या, तारा, रोहित्र यांचा पुन्हा वापर करण्यासारखा असल्यास त्याबाबतची किंमत / दर यांचा अंदाजपत्रकात समावेश करु नये.

ब) जुने सामग्री (साहित्य) नित्कृष्ट दर्जाचे / क्षमतेचे असल्यास योग्य गुणवत्ता असलेले साहित्य वापरण्यात यावे.

जसे की,

१. अस्तित्वात असलेले ६३ केव्हीए क्षमतेचे रोहित्र सद्यस्थितीत महावितरण वापरत नसल्याकारणाने १०० केव्हीए क्षमतेचे रोहित्र वापरण्यात येईल.

२. अस्तित्वात असलेली ३४/८० sqmm. आकाराची AAAC उच्चदाब वाहिनी सद्यस्थितीत महावितरण वापरत नसल्याकारणाने त्याऐवजी ५५/१०० sqmm AAAC वाहिनी वापरण्यात येईल.

३. उपरी वाहिनी भूमिगत करणेकरीता ३०० sqmm ची केबल वापरण्यात येईल.

४. वितरण रोहित्रांसाठी क्षमतेनुसार किंवा ९५ sqmm केबल वापरण्यात येईल.

५. जेथे रस्ते एकमेकांस ओलांडतात त्या ठिकाणी (रस्ता क्रॉसिंग) ३०० sqmm ची उच्चदाब केबल वापरण्यात येईल.

क) तथापी, जुन्या साहित्याचा पुर्नवापरणीबाबत अंतिम निर्णय महावितरणद्वारे घेण्यात येईल आणि तसे निश्चित करण्यात येईल.

१०. कामाच्या अंदाजपत्रकाची पडताळणी संबंधित अधीक्षक अभियंता, महावितरण यांचेकडून केली जाईल.

११. १.३% पर्यवेक्षण शुल्क महावितरण कंपनीत जमा केल्यानंतर, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण / सार्वजनिक बांधकाम विभाग / स्थानिक संस्थांना काम करण्याची परवानगी देण्यात येईल.

१२. महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली, सुरक्षा नियमांनुसार कामांची गुणवत्ता व संख्या तपासली जाईल.

१३. सामान्यत: मंजुर केलेल्या कामांमध्ये बदल मान्य केले जाणार नाहीत. तथापी काही कारणास्तव, अंमलबजावणी दरम्यान कामाच्या व्याप्तीमध्ये बदल असल्यास, अंदाजपत्रकास मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्याकडून मंजुरी घेऊन बदल ग्राहय धरला जाईल.

१४. योजनेची मंजुरी आणि विद्युत भार घेण्याची परवानगी संबंधित प्राधिकरणाने विद्युत निरीक्षकाकडून प्राप्त करावी.

१५. कामाची पुर्तता झाल्यानंतर, प्राधिकरणाने प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या आधारावर काम पूर्ण झाल्याचा अहवाल तयार करावा आणि कार्यान्वित करण्यास परवानगी देण्यात यावी.

**१६. मंजुर केलेल्या परंतु चालु न झालेल्या अंदाजपत्रकाचा आढावा.**

तयार झालेले / मंजुरी मिळालेले परंतु चालु न झालेले अशा सर्व अंदाजपत्रकाची पुर्नतपासणी संयुक्त समितीने हे परिपत्रक मिळाल्यापासून आठ दिवसांच्या आत करावी व सुधारीत अंदाजपत्रकास मंजुरी देऊन एजन्सीला २ आठवडयाच्या आत पाठविण्यात यावी.

१७. वरील मार्गदर्शक सुचना सर्व प्रकारचे रस्ता रुंदीकरण करण्यासाठीचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी (राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण / सार्वजनिक बांधकाम विभाग / स्थानिक संस्था) यांना हे परिपत्रक लागू असेल किंवा अस्तित्वात असलेल्या विद्युत पायाभूत संरचनेच्या स्थलांतराच्या कामांकरीता तसेच पुल बांधणीच्या कामांकरीता लागू असेल.

**टीप :- इंग्रजी व मराठी परिपत्रकात काही विसंगतता आढळल्यास इंग्रजी परिपत्रक ग्राहय धरण्यात यावे.**

**मुख्य अभियंता (वितरण)**

**प्रत सस्नेह रवाना :**

१. मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रकाशगड, मुंबई.
२. मा. संचालक (संचलन), म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रकाशगड, मुंबई.
३. मा. संचालक (प्रकल्प), म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रकाशगड, मुंबई.
४. मा. कार्यकारी संचालक - १/२/३/४, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रकाशगड, मुंबई.
५. मा. अतिरिक्त व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., औरंगाबाद.
६. मा. क्षेत्रिय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., पुणे / कल्याण / नागपूर.

**प्रत :**

१. मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रकाशगड, मुंबई.
२. सर्व अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., सं. व. सु. मंडळ.